दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या अखत्यारितील जमिनी बाबु जगजीवन राम छात्र आवास योजनेंतर्गत वसतीगृह बांधकामासाठी इतर मागास बहुजन कल्याण विभागास हस्तांतरीत करण्याकरीता महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**

**शासन शुद्धिपत्रक क्रमांक : दुवियो-२०२५/प्र.क्र.३५/पदुम ९,**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय विस्तार,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- ११ फेब्रुवारी, २०२६

**संदर्भ:-** १) कृषि व पदुम विभागाचे समक्रमांकित शासन निर्णय दि. ३०.०७.२०२५ व शासन शुद्धिपत्रक दि. ११.११.२०२५

२) उप आयुक्त, दुग्धव्यवसाय यांचे पत्र क्र. आदुवि-१६(२)/प्रस्ताव वसतीगृह/ बातराछआयो/ २०२५/११३, दि.१३.०१.२०२६

**शासन शुद्धिपत्रक** :

दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या जागा बाबु जगजीवन राम छात्र आवास योजनेंतर्गत वसतीगृह बांधकाम करण्यासाठी मुलांचे वसतीगृहाकरीता दीड एकर व मुलींचे वसतीगृहाकरीता दीड एकर जागा इतर मागास बहुजन कल्याण विभागास हस्तांतरीत करण्याकरीता कृषि व पदुम विभागाच्या संदर्भ क्र. १ येथील दि. ३०.०७.२०२५ च्या शासन निर्णयान्वये महसूल व वन विभागास प्रत्यार्पित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार सदर शासन निर्णयामध्ये अ.क्र.७ मधील शासकीय दूध शितकरण, वाशिम येथील सर्वे नं. १७ असे नमूद करण्यात आले आहे. तथापि, संदर्भ क्र. २ येथील पत्रान्वये शासकीय दूध योजना, वाशिम येथील सर्वे नं. १७/१ च्या ऐवजी मालमत्ता पत्रक झाले असल्याने न.भू.क्र. २२ अशी दुरुस्ती होणे आवश्यक असल्याचे कळविले आहे.

२. **त्यानुषंगाने कृषि व पदुम विभागाच्या संदर्भ क्र.१ येथील दि. ३०.०७.२०२५ च्या शासन निर्णयामधील अ.क्र.७ मध्ये शासकीय दूध योजना, वाशिम येथील सर्वे नं. १७/१ ऐवजी न.भू.क्र. २२ असे वाचावे.**

३.	सदर शासन शुद्धिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक क्र. २०२६०२१११७०६४०८८०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RANDHIR DATTA SURYAWANSHI

Digitally signed by RANDHIR DATTA SURYAWANSHI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and ADF Department, 2.5.4.20=26F8F5ACD62C6C81CBBF4ADE82E5A69A52233D9FDDE86D1600DEAC988BF231F7, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=97FBF2B8BE63A470F6483AEC6D4B0E42613AB19BFD9A6CC71592ECC9150571D5, cn=RANDHIR DATTA SURYAWANSHI
Date: 2026.02.11 17:07:41 +05'30'

**( रणधीर सुर्यवंशी )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मंत्री (दुग्ध) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव ( पदुम ), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय  वाशिम.
७. सह सचिव (ज-६), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
९. आयुक्त, दुग्धव्यवसाय विभाग, वरळी, मुंबई
१०. उपआयुक्त, दुग्धव्यवसाय विभाग, वरळी, मुंबई
११. प्रादेशिक दुग्ध व्यवसाय अधिकारी, अमरावती विभाग, अमरावती
१२. निवडनस्ती (पदुम-९).